एकांकिका आणि इतर नाटयप्रयोग त्या अमेरिकेच्या रंगभूमीवर सातत्याने सादर करीत असतात. मी त्यांना शुभेच्छा देतो आणि त्यांच्याकडून मराठी रंगभूमीची सेवा अधिकाधिक व्हावी यासाठी माझ्या सदिच्छा व्यक्त करतो.

नाटयसंमेलनाचे अध्यक्षीय भाषण हे पुन्हा पुन्हा करायचं नसंत. गतवर्षी बीड येथे नाटयसंमेलनाध्यक्ष या नात्याने केलेल्या भाषणात माझे नाटयविषयक विचार विस्तृतपणे मांडले आहेत. ते भाषण नाटयरसिकांनी जरुर वाचावे. आज प्रदीर्घ भाषण करणे योग्य नव्हे. समारंभाला अनुसरुन मी माझं भाषण थोडक्यात केलं आहे. आज मराठी रंगभूमीच्या दरबारात व्यावसायिक, प्रायोगिक, हौशी, कामगार नाटकांनी गर्दी केली आहे. प्रायोगिक रंगभूमीसाठी पूर्वी बंगाली नाटक प्रथम क्रमांकावर होते. आता ती जागा मराठी रंगभूमीने घेतली आहे. फक्त मराठी संगीत रंगभूमीची स्थिती चिंताजनक आहे. वास्तविक मराठी संगीत नाटक हे जागतिक रंगभूमीचे वैशिष्ट्य आहे. एकेकाळी तर संगीत रंगभूमीचा प्रचंड दबदबा होता. असं जरी असलं तरी संगीत रंगभूमी दृष्टीआड होत आहे याची मनाला खंत आहे. यावसायिक रंगभूमीची स्थिती फारशी उत्साहजनक नाही. मराठी रंगभूमीची सद्यस्थिती पाहून महाराष्ट्र शासनाने मराठी रंगभूमीसाठी विविध योजना सुरु केल्या आहेत. असे असूनसुध्दा मराठी व्यावसायिक रंगभूमीची सध्याची परिस्थिती सुस्थिर पायावर उभी नाही, याचं प्रमुख कारण दूरदर्शनचं आगमन ! साधारणपणे ८० वर्षापूर्वी मराठी रंगभूमीचा सुवर्णकाळ चालू असताना चित्रपट हे साधन लोकांच्या समोर आलं आणि त्याचा जबरदस्त धक्का मराठी रंगभूमीला बसला. मराठी रंगभूमीवरील चित्रपटांचं आक्रमण थोपवणं अशक्य झालं. आज जवळजवळ अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. भारतात दूरदर्शन हे साधन करमणूकीसाठी लोकांसमोर आलं. आज मराठी भाषेतील दूरदर्शनच्या अनेक वाहिन्या